आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, २३ नोव्हेंबर २०२१ । वर्ष : ४ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ४ । पाने : ४ । मूल्य २ ₹



## मुख्यमंत्री ठाकरे यांची प्रकृती उत्तम

मुंबई : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावरील स्पाईन सर्जरी यशस्वी झाली असून त्यांची प्रकृती उत्तम आणि स्थिर आहे. सध्या एच एन रिलायन्स रुग्णालयात त्यांची फिजिओथेरपी सुरू आहे. त्यांना योग्यवेळी डिस्चार्ज देण्यात येईल असे रुग्णालयाच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क

9423209823

मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# बप्पासाहेब घुगे शिवसेनेचे नवे जिल्हाप्रमुख?

▶ प्रतिनिधी

बीड : शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्यावर गुटखा साठा प्रकरणी गुन्हा दाखल झाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. खांडे यांच्या जागी शिवसेना एका नव्या चेहऱ्याची चाचपणी करत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, शिवसेनेशी एकनिष्ठ असलेले उद्योजक तथा शिवसेनेचे जिल्हा समन्वयक बप्पासाहेब घुगे यांची शिवसेना जिल्हाप्रमुखपदी वर्णी लागू शकते. अशी शक्यता वर्तवली जात आहे.



शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्यावर तीन दिवसांपूर्वी गुटखा साठा प्रकरणात गुन्हा दाखल झाला होता. हे प्रकरण राज्यभर गाजले. त्यानंतर फरार असतानाही शिवसेना सचिव अनिल देसाई यांच्या स्वागताला ते हजर होते. यावरून चांगलेच वादंग पेटले होते. हेच सर्व खांडे यांच्या अंगलट आले. सोमवारी सामना दैनिकातून खांडे यांच्या पदाला स्थगिती दिल्याचे जाहीर केले आहे. लवकरच नव्या जिल्हाप्रमुखचे नाव जाहीर केले जाईल असेही त्यात म्हटले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले. यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दरम्यान, शिवसेनेच्या वरिष्ठ नेतृत्वाने बीड जिल्हाप्रमुख पद नव्या चेहऱ्याला देण्याचे निश्चित केल्याची माहिती मिळत आहे. खांडे यांच्या जागी बप्पासाहेब घुगे अथवा माजी जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांचे कमबॅक होवू शकते, अशीही जोरदार चर्चा शिवसेनेच्या वर्तुळात केली जात आहे.

### शिवसेना माझा श्वास : बप्पासाहेब घुगे

बप्पासाहेब घुगे २००१ पासून शिवसेनेशी एकनिष्ठ आहेत. माजी आमदार प्रा.सुनिल धांडे यांच्या नेतृत्वाखाली २००५ साली बोरफडी शाखाप्रमुख म्हणून घुगे यांनी आपल्या कार्यास प्रारंभ केला. २००८ साली घुगे येळंबघाट सर्कलप्रमुख झाले. पुढे २०१२ साली जिल्हा संघटक म्हणून त्यांची वर्णी लागली. तर २०१८ त्यांच्यावर जिल्हा समन्वयक पदाची शिवसेनेने जबाबदारी दिली. गेली वीस वर्षे शिवसेनेशी एकनिष्ठ राहून कार्य केल्याबद्दल शिवसेना निश्चित दखल घेवून घुगे यांना जिल्हाप्रमुख पद बहाल करेल, असा आशावाद शिवसैनिकांना आहे. दरम्यान, 'वर्तमान'शी बोलताना बप्पासाहेब घुगे म्हणाले, 'शिवसेना माझा ध्यास आहे, शिवसेना माझा श्वास आहे' कोणत्याही पदासाठी आपण काम करत नाही, मात्र पक्ष देईल ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडू, असेही घुगे म्हणाले.

### अनिल जगतापही कमबॅकच्या तयारीत?



बीड जिल्ह्यातील शिवसेनेच्या अंतर्गत राजकीय घडामोडी घडल्यानंतर कुंडलिक खांडेची गच्छंती अटळ मानली जात आहे. माजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगतापही कमबॅक तयारीत असल्याचे बोलले जात आहे. जगताप यांची वर्णी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### लस नाही, एंट्री नाही जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश



बीड : जिल्ह्याचे लसीकरणाचे प्रमाण राज्याच्या तुलनेत अत्यंत कमी असून हे वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी जिल्ह्यात अनेक निर्बंध घातले आहेत. व्यवसायिकांबरोबरच त्यांच्या कर्मचाऱ्यांना लसीचा किमान एक डोस घेणे आवश्यक असून घेतला नसल्यास त्यांना दुकाने उघडता येणार नाहीत, शिवाय शासकीय-निमशासकीय कार्यालयात देखील लस घेतली नसल्यास नो व्हॉक्सिन नो इंट्री प्रवेश दिला जाणार नाही. शैक्षणिक संस्था, क्लासेससह इतर संस्थांमध्ये देखिल लसीकरण केले नसल्यास प्रवेश नाकारला जाणार आहे. याचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. यासंदर्भातील आदेश जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी रविवारी दि.२१ नोव्हेंबर रोजी रात्री काढले आहेत.

### लसीकरणासाठी जिल्हा शल्यचिकित्सक रस्त्यावर

माजलगाव : कोविड लसीकरणासाठी आरोग्य विभागाने कंबर कसली आहे. बीडच्या माजलगावमध्ये बाहेरून येणाऱ्या प्रत्येक नागरिकास लसीकरण बंधनकारक करण्यात आलंय. याच पार्श्वभूमीवर स्वतः जिल्हा शल्यचिकित्सक रस्त्यावर उतरले आहेत. कल्याण-विशाखापट्टणम महामार्गावर आरोग्य विभागाकडून लसीकरण मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान प्रत्येक नागरिकांची तपासणी करून लसीकरण बंधनकारक केले जात आहे.



### तरंगत्या रंगमंचावर सांस्कृतिक नृत्याविष्कार

बीड : येथे मागील २५ वर्षापासून संस्कार भारतीमार्फत कंकालेश्वर महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमात खंड पडला होता. यंदा हा कार्यक्रम त्रिपुरा पौर्णिमेनिमित्त घेण्यात आला आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे शहरातील कंकालेश्वर मंदिर परिसरात असणाऱ्या जलाशयावर, तरंगता रंगमंच उभारून आपली कला सादर केली जाते. कार्यक्रमात भरतनाट्यम, संगित असे विविध कार्यक्रम यावेळी घेण्यात आले. डोळ्याचे पारणे फेडणारा कार्यक्रम ठरला आहे. नगराध्यक्ष भारतभूषण क्षीरसागर यांच्यासह बीडकरांनी कार्यक्रम पाहण्यासाठी गर्दी केली होती.

## सिंदफणा तीरावरून

### राजकारण

**वचननाम्या पाठोपाठ**
**जाहिरनामा येतो,**
**शब्दांच्या फिरवाफिरवीत**
**जनतेचा मामा होतो.**

■ शिवराम होके, माजलगाव

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !



# हळद धुतली नाही; जीवनयात्रा संपविली

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील नित्रुड येथील पांडुरंग डाके याचा विवाह माजलगाव येथील मुलीशी झाला होता. शनिवारी येथील मंगल कार्यालयामध्ये रेशीम गाठी बांधल्या गेल्या. सोमवारी या लग्नानिमित्त सत्यनारायण महापूजा करण्यात आली. पुजा आटोपताच नवरदेवाने शेतात जाऊन गळफास घेत आत्महत्या केली. दरम्यान, अंगाला लागलेली हळद धुतली नाही तरच वराने जीवनयात्रा संपविल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

नित्रुड येथे पांडुरंग रामकिसन डाके (वय २६) हा युवक शेती करतो. तसेच त्याचे किराणा दुकानही आहे. शनिवारी माजलगाव येथील मंगल कार्यालयात थाटामाटात लग्न झाले. यानंतर सोमवारी सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त नातेवाइकांना पांडुरंग डाके जेवणाचे निमंत्रण देण्यात आले होते. सत्यनारायण पूजा आटोपल्यानंतर नवरदेवाने जेवण केले आणि शेतात जाऊन येतो असे घरी सांगितले. यानंतर शेतातच आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. शेजारील शेतकऱ्याने सदरील घटना डाके कुटुंबीयांना सांगितली. यानंतर पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनाकरिता ग्रामीण रूग्णालयात पाठविला. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही.

# अतिवृष्टीग्रस्तांना राज्य सरकारने न्याय द्यावा : राजेंद्र मस्के

▶ प्रतिनिधी

बीड : कोरोना लॉकडाऊनची आर्थिक झळ संपण्यापूर्वीच सप्टेंबर २०२१ मध्ये राज्यासह जिल्ह्यात सलग सात वेळा अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान-भरपाई मिळालीच पाहिजे, अशी मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली आहे.

कापूस, उडीद, मूग, सोयाबीन, तूर या खरीप पिकांचे आतोनात नुकसान झाले. नगदी पिकांना पर्जन्य वृष्टीचा तडाखा बसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला. या नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजाराची अर्थिक मदत व वीज बील माफ करण्याची मागणी करण्यात आली. प्रशासनाने या वंचीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची भावना आणि आर्थिक नुकसान लक्षात घेऊन मांजरसुबा महसुल मंडळातील शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे. या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान मिळालेच पाहिजे. अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली आहे. हे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या रस्ता रोको आंदोलनामुळे धुळे सोलापूर, औरंगाबाद या महामार्गावरील वाहतुक एक तास ठप्प झाली होती. महसुल प्रशासनाच्या लेखी अश्वासना नंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

# वेतन मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही

## नगरपालिका सफाई कामगार महिलांचा निर्धार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील नगर परिषदेच्यास्वच्छता विभागात रोजंदारीवर काम करणाऱ्या सफाई कामगारांचे १८ महिलांचे गत चार महिन्यांपासून वेतन थकल्याने १६ नोव्हेंबरपासून नगरपालिका कार्यालयासमोर त्यांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. या महिलांचा उपोषणाचा सोमवारी सातवा दिवस असतानाही नगरपालिका प्रशासनाने याची दखल घेतली नाही.

या कामगारांनी यापूर्वी अनेक वेळा निवेदने देऊन, आंदोलने केली होती; मात्र मुख्याधिकाऱ्यांनी केवळ तोंडी, लेखी आश्वासने दिली. नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी आश्वासन दिले होते. मात्र त्याचीही पूर्तता झाली नाही. रेखाबाई सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या उपोषणाचा सातवा दिवस असतानाही प्रशासनाने दखल घेतलेली नाही. यामुळे या महिलांमध्ये नगरपालिकेविरोधात रोष निर्माण होत आहे. या आंदोलनात हौसाबाई डोंगरे, लक्ष्मीबाई सुतार, कमल शेळके या कामगारांचा समावेश आहे.

# गोव्यात ५२ व्या इफ्फीला दिमाखात प्रारंभ

## सलमान खान, रणवीर सिंगच्या हजेरीने सोहळ्याला चार चाँद

▶ भगीरथ तोडकरी

पणजी (गोवा) : राजधानी पणजीत भारताच्या ५२ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला शनिवारी दिमाखदार सोहळ्यात प्रारंभ झाला. या महोत्सवात भारतीय अभिनेत्यांसह देश-विदेशातील नामवंत दिग्दर्शक, निर्माते, अभिनेते, अभिनेत्रींसह प्रसार माध्यम प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला आहे.

भारताचा ५२ वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सुरू झाला आहे. या चित्रपट महोत्सवात चित्रपट जगतातील अनेक दिग्गज कलाकार सहभागी होणार आहेत. यापैकी अनेक सेलिब्रिटी मंचावर आपल्या उत्कृष्ट अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकण्यासाठी सज्ज आहेत. या सोहळ्यात सलमानच्या दबंग डान्सने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. त्याच्यासोबत रणवीर सिंगनेही आपल्या अप्रतिम ऊर्जेने मेळाव्यात भर घातली. गोव्यात हा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सुरू झाला आहे.


या महोत्सवात सलमान खानच्या नृत्याविष्काराने सर्वांची मने जिंकली. दबंगच्या 'हुड हुड दबंग' या गाण्यावर सलमानने फुल स्टाईलमध्ये डान्स केला. त्याची स्टाइल प्रेक्षकांना खूप आवडली आहे. या चित्रपट महोत्सवाशी संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यातील एका व्हिडिओमध्ये सलमान खानचा डान्स परफॉर्मन्स दिसत आहे. ग्रुप डान्सर्ससोबत सलमान दबंगची सिग्नेचर स्टेप करतोय. पहिल्या दिवशीचा सलमानचा डान्स हा शेवटचा परफॉर्मन्स होता. याशिवाय रणवीर सिंगनेही आपल्या एनर्जीने तेथील वातावरण प्रसन्न केले. नेहमीप्रमाणेच त्याच्या कामगिरीमध्ये पूर्ण एनर्जी दिसून आली.

'कर हर मैदान फतेह' या गाण्यावर श्रद्धा कपूरने मस्त डान्स केला. सलमान खान आणि रणवीर सिंग यांच्याशिवाय श्रद्धा कपूर, मौनी रॉय, जेनेलिया डिसूझा आणि रितेश देशमुख यांच्यासह अनेक कलाकारांनी या कार्यक्रमांमध्ये परफॉर्मन्स दिला आहे. या सोहळ्याला मोठे नेते आणि कलाकार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन करण जोहर आणि मनीष पॉल यांनी केले. यावेळी केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर आणि गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत उपस्थित होते. या शोमध्ये बॉलिवूडमधील अनेक दिग्गज कलाकार सहभागी झाले होते. २८ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सुमारे ७३ देशांतील १४८ चित्रपटांचा समावेश असेल. १२ जागतिक प्रीमियर्स आणि सात आंतरराष्ट्रीय प्रीमियर्स, २६ आशिया प्रीमियर्स आणि सुमारे ६४ भारतीय प्रीमियर्स होतील.









**हेमा मालिनी यांना जीवनगौरव :** हेमा मालिनी यांना इंडियन पर्सनॅलिटी ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी एएनआयला सांगितले की, 'हे माझ्या अनेक वर्षाच्या श्रमाचे फळ आहे. खासदार असतानाही मी मथुरेत विविध कामे करत आले आहे, त्यामुळे त्याचा प्रेक्षकांवरही परिणाम होतो कारण आधी मी डान्सर आहे, नंतर चित्रपट कलाकार आणि आता खासदार आहे.'



## संपादकीय

# एसटी टिकली पाहिजे!

महाराष्ट्रातील एसटीची चाके बेमुदत थांबलेली आहेत. सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या गंभीरपणे घेवून त्यांना न्याय देण्याची भूमिका घ्यावी. आशिया खंडात सर्वात मोठी अशी ख्याती असलेल्या एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या संपाने, महाराष्ट्रातील शहरी, ग्रामीण भागांतील बाजारपेठांचे व्यवहार पुन्हा एकदा विस्कळीत झाले आहेत. एसटी महामंडळाचे शासनामध्ये विलीनीकरण करावे, या मागणीसाठी एसटीच्या कर्मचाऱ्यांनी संघटनांना बाजूला ठेवून संप जाहीर केला. त्यात ते यशस्वी झाले. शासन आणि एसटी कर्मचारी यांच्यात संप मिटण्यासाठी कोणताही तोडगा निघू शकला नाही. दोन्ही बाजू आपापल्या भूमिकांवर ठाम राहिल्याने महाराष्ट्रातील दळणवळणाचे महत्त्वाचे साधन असलेल्या एसटी बसेस आगारातच उभ्या असल्याने गावो-गावी प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे हाल झाले आहेत. एसटी बस ही प्रवासाचं जसं माध्यम आहे, तसंच ते ग्रामीण भागांतील सर्वसामान्य शेतकऱ्यांचे शेतमाल ने-आण करण्याचंही साधन आहे. यामुळे एसटी बसेस रस्त्यावर नसल्याने खरंतर रस्त्यावरच्या व्यवसायावर अवलंबून असणारे सर्वजण फार अडचणीत आले आहेत. नियमित एसटी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. खासगी प्रवासी गाड्यांतून प्रवास करताना सर्वसामान्यांना दुप्पट पैसे मोजावे लागत आहेत. याचा परिणाम सामान्यांच्या आर्थिक नियोजनावर झाला आहे. शासकीय कार्यालयांमध्ये काम करणारा कर्मचारी एसटी बसमधून प्रवास करतो. त्या सर्वांवर याचा परिणाम झाला आहे. संपूर्ण महाराष्ट्र एकेकाळी एसटीवरच अवलंबून होता. आमदारांसाठी एसटीमध्ये राखीव जागा होत्या. त्यावेळी आमदार सीट' म्हणूनच त्याची ओळख होती. मुंबईला खास या राखीव जागांवरून आमदार प्रवास करायचे. गेल्या काही वर्षांत एसटीचे ज्या पद्धतीने शोषण केले गेले त्यातून ऐश्वर्य असलेली एसटी कंगाल झाली. महाराष्ट्रात सत्तेवर असणाऱ्या त्या-त्या वेळच्या सत्ताधाऱ्यांनी एसटीचे फार पद्धतशीरपणे लचके तोडले आणि ती' कंगाल कशी होईल हेच पाहिले. शिवशाही बसच्या माध्यमातून खासगीकरणाचा शिरकाव करण्यात आला आणि बघता-बघता मूळ मालक उपाशी ओसरीवर, अशीच अवस्था एसटीची करण्यात आली. एसटी कर्मचारी, अधिकाऱ्यांनीही कालानुरूप जे बदल करणे अपेक्षित होते तसे काही केले नाही. त्यामध्येही काहीसा तोच माज, मस्ती आणि उन्माद तसाच ठेवला. यामुळेही या साऱ्या शासकीय, राजकीय अतिक्रमणात नुकसान होत राहिले. गेले काही दिवस चालू असलेल्या एसटीच्या संपाने एसटी महामंडळाचा कर्मचारीही हैराण झाला आहे; परंतु त्याचबरोबर आजही ग्रामीण दळणवळणाचे प्रमुख साधन असलेल्या एसटीमुळे सारे काही ठप्प झाले आहे. एकीकडे कोरोनाने कोकणातील सामान्यजन हैराण झाले होते. उद्योग, व्यवसायांवर कोरोनाने झालेला परिणाम, त्यातून सावरण्यासाठी कोकणातील जनतेने प्रयत्न चालविले होते. कोरोनाच्या मधल्या दीड ते दोन वर्षानंतर यातून उठून उभं राहण्याचा प्रयत्न केला जात होता; परंतु त्यातच आता सुरू असलेल्या एसटीच्या संपाने नंतर दुसरे संकट उभे केले आहे. सामान्य माणसाचे महिन्याचे एक गणित असते. ते गणित गेल्या दीड-दोन वर्षांत विस्कळीत झाले आहे. आताच्या या संपात ते पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हा संप एसटी कर्मचाऱ्यांपुरता किंवा त्यांच्या कुटुंबापुरता मर्यादित नाही. त्यात जशी त्यांच्या कुटुंबीयांची होरपळ होत आहे, तशी एसटीशी जोडले गेलेल्या असंख्य कुटुंबांशीही ती' जोडली गेलेली आहे. एकीकडे कोकणात कोरोना संकट पूर्णपणे दूर झालेले नाही. त्याची भीती आजही कायम आहे. त्या सावटाखाली सगळ्यांचा मुक्त वावर होत आहे. त्यातच एसटीचा संप आणि अवकाळी पावसाचे संकट अशी विचित्र स्थिती कोकणात आहे. त्यातच नगर परिषदांचे आरक्षण जाहीर झाले आहे. काही महिन्यांतच जिल्हा परिषद निवडणुकाही जाहीर होतील. या सर्व पार्श्वभूमीवर कोकणातील राजकीय वातावरण देखील ढवळून निघत आहे. अधून-मधून पडणारा अवकाळी पाऊस कोकणात जसे भातपिकांचे नुकसान करणारा ठरला आहे, तशी कोकणात तापसरीची साथही पसरत आहे. कोकणात भातकापणीच्या सुमारास दरवर्षीच तापसर जोर धरत असते आणि ती पसरत असते. मग तो ताप कोणता याच संशोधन सुरू होते. त्या तापसरीचा शोध लागेपर्यंत दुसरा ताप आलेला असतो. असे सगळ्या विचित्र वातावरणात कोकणातील सामान्य माणूस जात आहे. त्याला तालुक्याच्या ठिकाणी जायला देखील एसटीच हवी असते. तीच त्याच्या हक्काची आणि त्यातल्या त्यात त्याच्या खिशाला परवडणारी असते; परंतु संपाने सारं थांबलं आहे. बोलणी यशस्वी झाली, सकारात्मक संवाद झाला, तर संपही मिटेल. एसटी कर्मचाऱ्यांची कुटुंबे बेमुदत संपामुळे चिंताग्रस्त झालेली आहेत. या प्रश्नाकडे सहानुभूतीपूर्वक विचार करावा. जनसामान्यांची एसटी टिकली पाहिजे, असे महाराष्ट्रातील तमाम जनतेला वाटते.

# साथरोगांचा शोध घेणारे सॉफ्टवेअर!

**कोरोना वायरसने जगाला काही धडे दिलेत. त्यातून नवनवी संशोधनं उभी राहिली. त्याचाच भाग म्हणून अमेरिकेच्या जॉर्जिया स्टेट युनिवर्सिटीच्या संशोधकांनी एक नवं कम्प्युटर सॉफ्टवेअर बनवलंय. या सॉफ्टवेअरमुळे भविष्यात कोरोनासारखा एखादा साथरोग, त्याचे दमछाक करणारे वॅरियंट शोधणं सहज शक्य होईल या संशोधकांना वाटतंय. तसं झालं तर ही कम्प्युटर विज्ञानातली एक क्रांती ठरेल.**

**जिज्ञासा**

**अक्षय शारदा शरद**

कोरोना वायरसमुळे जग काही काळ ठप्प झालं होतं. कोरोनाच्या लाटांमुळे सर्वसामान्य लोक हैराण झाले. आपलं भटकणं थांबलं. रोजीरोटीवर परिणाम झाला. जगभरातल्या अर्थव्यवस्थांची दिवाळं निघाली. या कोरोना वायरसनं सगळ्यांनाच घाम फोडला होता. अजूनही लाटेची भीती असली तरीही कोरोनाचा हा ग्राफ हळूहळू खाली येतोय. सुरवातीच्या काळात नवनवे शब्द सातत्याने आपल्या कानावर पडायचे. टेंशन वाढायचं. हे वाढलेलं टेंशन लस, त्यावरची संशोधनं, औषधं यामुळे कमी होत गेलं. त्यामुळेच या सगळ्यातून आपण हळूहळू सावरतो आहोत. पुढे येणाऱ्या अनेक साथी टाळण्यासाठी म्हणून कोरोनाच्या साथीने जगाला काही धडे दिलेत. गेल्या दोन वर्षांच्या काळात वैज्ञानिक पद्धतीने झालेला अभ्यास, संशोधनं, निष्कर्ष याच्या तळाशी आहेत. कोरोना सारख्या साथरोगांचा शोध घेण्यासाठी आलेलं नवं सॉफ्टवेअर याचं फलित म्हणायला हवं.

सॉफ्टवेअरनं साथरोगांचा पाठलाग?

तंत्रज्ञान बदलतंय. या बदललेल्या तंत्रज्ञानाचे चांगले-वाईट अनुभव आपण घेत आहोत. मागच्या दोन वर्षातल्या कोरोना काळानं आपल्याला नव्यानं विचार करायला, स्वतःमधे डोकावून पहायला भाग पाडलंय. त्यातूनच नवनवे शोध पुढे येतायत. पुढेही येत राहतील. अमेरिकेच्या जॉर्जिया स्टेट युनिवर्सिटीच्या संशोधकांनी एक कम्प्युटर सॉफ्टवेअर बनवलंय. स्पॅनिश फ्ल्यू, बर्ड फ्ल्यू, इबोला, स्वाईन फ्ल्यू आणि आता कोरोना अशा अनेक साथ रोगांचा अनुभव जगाने घेतलाय. अशीच एखादी साथ पुढच्या काळात आलीच तर त्याचा त्याआधीच शोध घेण्याचं काम हा सॉफ्टवेअर करू शकेल असं या संशोधकांचं म्हणणं आहे. 'जर्नल ऑफ कम्प्युटेशन बायोलॉजी'नं जॉर्जिया युनिवर्सिटीच्या संशोधकांचा



रिसर्च पब्लिश केलाय. कोरोनासारखे वायरस जगभर पसरण्याचा आधीच त्यांचा शोध लावून त्यावर तत्काळ उपाययोजना करणं या सॉफ्टवेअरमुळे शक्य होईल असंही या संशोधनामधे म्हटलंय.

जिनोम सिक्वेन्सिंगचं काम सोपं

जिनोम सिक्वेन्सिंग या तंत्रज्ञानामुळे वायरसमधलं म्युटेशन, त्याची तीव्रता समजते. याआधीच्या कोणत्याच वायरसमधे कोरोना वायरसच्या म्युटेशन इतके बदल झाले नव्हते असं लॅन्सेट या जगप्रसिद्ध आरोग्यविषयक मॅगझिनमधेही म्हटलं होतं. एका म्युटेशनचा शोध लागेपर्यंत दुसरं म्युटेशन हजर असतं. त्यामुळे जगभरातल्या आरोग्य यंत्रणेसमोरचं हे एक मोठं आव्हान होतं. जॉर्जिया युनिवर्सिटीच्या संशोधकांनी बनवलेलं सॉफ्टवेअर वायरसमधल्या जिनोमची तत्काळ नोंद घेऊ शकतं असं इथल्या कम्प्युटर विज्ञान विभागाचे प्रोफेसर आणि यातले महत्वाचे संशोधक अलेक्झांडर झेलिकोवस्की यांनी या रिसर्च पेपरमधे म्हटलंय. तसंच वायरसच्या म्युटेशनबद्दल जी काही नवी आव्हानं निर्माण होतायत त्यासाठी हे संशोधन फार महत्वाचं असल्याचं झेलिकोवस्की यांना वाटतंय. हे नवं सॉफ्टवेअर कम्प्युटरपेक्षाही अधिक वेगाने काम करू शकतं असंही हे संशोधन केलेल्या टीमचं म्हणणं आहे. जिनोम सिक्वेन्सिंगचं कामही हा सॉफ्टवेअर अगदी दोन तासांपेक्षा कमी वेळात करत असल्यामुळे जगभरातल्या देशांसाठी वायरसवर संशोधन करणं सोपं जाऊ शकेल.

वॅरियंटचा शोध घेणं शक्य?

कोरोना वायरसच्या जगभरातल्या वेगवेगळ्या लाटांमधे अनेक प्रकारचे वॅरियंट आढळून आले. भारतातला डेल्टा, ब्राझीलमधे गामा, दक्षिण आफ्रिकेत बीटा, इंग्लंडमधे अल्फा हे यातले प्रमुख प्रकार होते. या वॅरियंटमुळे कोरोना वायरसच्या मूळ रचनेत झालेले बदल संशोधकांच्या काळजीचं कारण होतं. त्यामुळे संशोधकांना नेमका अंदाज लावायला अडचणी येत होत्या. जॉर्जिया स्टेट युनिवर्सिटीच्या संशोधकांनी ३ लाखांपेक्षा अधिक वॅरियंटचं त्यांच्या उपप्रकारांचं विश्लेषण केल्याचं म्हटलंय. त्याचा एक डाटाही त्यांनी तयार केलाय. 'जगभरातल्या वैज्ञानिकांना हे आश्चर्यकारक वाटत असलं तरीही त्यांच्यासाठी हा डाटा फायदेशीर ठरेल. त्यासाठी हे सॉफ्टवेअर महत्वाचं ठरणार आहे.' असं झेलिकोवस्की यांना वाटतंय. कोरोना वायरस आपल्या मूळ रचनेत बदल करून जगभर पोचला. भारतातल्या डेल्टा वॅरियंटनं तर जगभर कहर केला होता. या सॉफ्टवेअरमुळे वायरस नेमका कशा पद्धतीने आपला आकार बदलतोय तसंच त्यावर लक्ष ठेवणं सहजशक्य होईल. शिवाय हा सॉफ्टवेअर अगदी फ्रीमधे डाऊनलोड करता येईल असं जॉर्जियाच्या संशोधकांनी म्हटलंय.

तर अशीही कम्प्युटर क्रांती

कुणाला काही कल्पना नसताना कोरोना वायरसनं जगाला कवेत घेतलं. जग बेसावध होतं. भारतानेही या सगळ्याचे परिणाम भोगलेत. लस आल्यामुळे आपल्यावरचं संकट कमी झालं. पण ते पूर्णपणे टळलेलं नाही. हा वायरस कायम राहील असं या साथरोग तज्ञांना वाटतंय. याआधीही असे वायरस आलेत. त्यामुळे पुढच्या काळातही ते येत राहतील. त्यासाठी आतापासून सावध रहायला हवं. प्रभावी उपाययोजना करायला हव्यात. त्याचाच एक भाग म्हणजे जॉर्जिया स्टेट युनिवर्सिटीच्या संशोधकांनी बनवलेलं हे सॉफ्टवेअर असल्याचं अलेक्झांडर झेलिकोवस्की यांना वाटतंय. या कम्प्युटर सॉफ्टवेअरमुळे साथरोगांचा पाठलाग करणारं शक्य होईल. जगभरातल्या देशांना आपली धोरणं आखता येतील. भविष्यात अशी कोणती साथ आलीच तर लॉकडाऊन, सोशल डिस्टन्स, आणि वेगवेगळ्या चाचण्या यासंबंधी वेळीच उपायही केले जातील. हा सॉफ्टवेअर कम्प्युटर विज्ञानात झालेल्या क्रांतीचा परिणाम आहे.

# जय भीम : समाज वास्तवाचं भेदक दर्शन

**निवृत्त न्यायमूर्ती के.चंद्रू हे तामिळनाडूमधेच नाही, तर देशभरात परिचित असलेलं महत्त्वाचं नाव. न्या.चंद्रू यांच्या वकिली कारकिर्दीतल्या एका गाजलेल्या खटल्यावर जय भीम' हा सिनेमा तयार करण्यात आलेला आहे. चंद्रू यांनी हेबियस कॉर्पस अर्थात सदेह उपस्थितीची याचिका दाखल करून त्याआधारे पोलिस कोठडीतल्या अत्याचारात झालेल्या आदिवासींच्या मृत्यूला वाचा फोडली आणि मरणोत्तर न्याय मिळवून दिला.**

**विशेष**

**डॉ.आलोक जत्राटकर**

मद्रास उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती के. चंद्रू हे आपल्या समाजहितैषी ऐतिहासिक निकालांमुळे केवळ तामिळनाडूमधेच नाही, तर देशभरात सर्वदूर परिचित असलेलं महत्त्वाचं नाव. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेच्या माध्यमातून देशातल्या नागरिकांना दिलेल्या मूलभूत हक्क, मानवाधिकार आणि समता या मूल्यांचा सन्मान वृद्धिंगत करण्याचं काम त्यांनी आपल्या कारकिर्दीत केलं.

के. चंद्रूंच्या जीवनशैलीतही समतेचा विचार

न्या. चंद्रू यांनी त्यांच्या कारकिर्दीत ९६ हजारांहून अधिक इतक्या विक्रमी संख्येने खटले निकाली काढले. हे खटलेही काही असेतसे नव्हते. त्यामधे भारतीय समाजावर दूरगामी सकारात्मक परिणाम करतील, अशा अनेक प्रकरणांचा समावेश होता. जात-धर्मनिरपेक्ष समान दफनभूमी, माध्यान्ह आहार योजनेतल्या कर्मचाऱ्यांची आरक्षणनिहाय नियुक्ती, महिलांना मंदिरांमधे पौरोहित्याचा अधिकार, नाट्य प्रयोगांसाठी पोलिस परवानगीची अट रद्दबातल, अशा काही प्रकरणांचा वानगीदाखल उल्लेख करता येईल. केवळ न्यायपालिकेमधल्या निर्णयांच्या संदर्भातच नाही, तर प्रत्यक्ष वैयक्तिक आचरणाच्या बाबतीतही ते अत्यंत सजग राहिले. आपल्या नियमित जीवनशैलीमधे त्यांनी सदैव समतेचा अंगीकार आणि पुरस्कार केला. आपल्या न्यायालयात वकिलांकडून स्वतःला माय लॉर्ड' संबोधून घेणं त्यांनी नाकारलं. न्यायमूर्तींचं आगमन होत असल्याची घोषणा करवून घेण्याची प्रथाही त्यांनी स्वतःसाठी नाकारली. एवढंच नाही, तर व्यक्तिगत सुरक्षा व्यवस्थाही घेतली नाही. न्यायाधीश म्हणून रुजू झाल्याच्या पहिल्या आणि अखेरच्या दिवशीही आपल्या मिळकतींचं विवरण सादर करणारे ते आगळं व्यक्तिमत्त्व होते. निवृत्तीच्या दिवशीच आपली मोटार जमा करून लोकल ट्रेनने घरी परतणारे एक सन्माननीय न्यायमूर्ती म्हणजे के. चंद्रू!

सत्यघटनेवर जय भीम सिनेमा

न्या. चंद्रू यांच्याविषयी लिहिण्याचं कारण म्हणजे त्यांच्या वकिली कारकिर्दीतल्या अनेक महत्त्वाच्या खटल्यांपैकी एका गाजलेल्या खटल्यावर करण्यात आलेला जय भीम' हा सिनेमा ओटीटी प्लॅटफॉर्मवर दाखल झालाय. रिलीजच्या अवघ्या दहा दिवसांच्या




आतच दि शौशैंक रिडेंप्शन' आणि द गॉडफादर' यासारख्या सिनेमांना मागे सारत आयएमडीबी रेटिंगमधे ९.६ रेटिंगसह सर्वोच्च स्थानी दाखलही झाला आहे. दक्षिणेकडची लोकप्रिय स्टार जोडी सूर्या आणि ज्योतिका यांची निर्मिती असलेल्या जय भीम'चं लेखन आणि दिग्दर्शन टी. जे. ज्ञानवेल यांनी केलंय. १९९३मधे तामिळनाडूच्या कडलोर इथं घडलेल्या सत्यघटनेवर आधारित हा सिनेमा आहे. हा खटला के. चंद्रू वकील असताना १९९५मधे उभा राहिला आणि २००८ला त्याचा निकाल लागला. चंद्रू यांनी हेबियस कॉर्पस अर्थात सदेह उपस्थितीची याचिका दाखल करून त्याआधारे पोलिस कोठडीतल्या अत्याचारात झालेल्या आदिवासीच्या मृत्यूला वाचा फोडली आणि मरणोत्तर न्याय मिळवून दिला. राजाकन्नू हा इरुला या अनुसूचित जमातीमधला आदिवासी कष्टकरी. सिनेमात इरुला जमात दाखवली असली तरी प्रत्यक्ष मूळ प्रकरणात हा आदिवासी कुरावा या जमातीमधला होता. या जमातीची नोंद आजही अनुसूचित जमातींमधे करण्यात आलेली नाही, असं न्या. चंद्रू यांनी एका मुलाखतीत सांगितलंय. राजाकन्नूसोबत त्याचा भाऊ आणि मेहुण्यावर चोरीचा ठपका ठेवून पोलिस पकडतात.न केलेली चोरी कबूल करवून घेण्यासाठी कोठडीत त्यांना प्रचंड मारहाण करतात. त्यांच्या पत्नींनाही मारहाण आणि विनयभंग करतात. यात राजाकन्नूचा मृत्यू होतो. तो मृत्यू दडपण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न आणि न्यायासाठी न्यायपालिकेसमोर उभी राहिलेली राजाकन्नूची पत्नी सेंगिनी याभोवती सिनेमाचं कथानक फिरतं. अर्थात सिनेमा एक कोर्टरूम ड्रामा असला तरी भारतातलं स्तरित, भंजित सामाजिक वास्तव तो अत्यंत भेदकपणाने आपल्यासमोर मांडतो. हीच या सिनेमाची ताकद आणि लोकप्रियतेचं गमक आहे.

पोलिस कोठडीतलं जातीय शोषण

सेंगिनीला न्याय मिळवून देण्यासाठी ठाम उभा राहिलेल्या वकील चंद्रूंच्या भूमिकेतल्या सूर्या आणि सच्चे पोलिस अधिकारी आय. जी.पेरुमलस्वामी अर्थात प्रकाश राज ही दोनच मोठी नावं सिनेमात आहेत. मात्र, आपल्या मनावर ठसठसत राहते ती सेंगिनीच्या भूमिकेतली लिजो मॉल होजे. सेंगिनीचे न्यायासाठी याचना करणारे बोलके डोळे आणि तिच्या व्यक्तिमत्त्वातले बदल लिजोने अत्यंत ताकदीने दर्शवले आहेत. पोलिसांचं, त्यांच्याकडून होणाऱ्या हिंसेचं समर्थन आणि उदात्तीकरण करणारे सिनेमा आपल्याकडे नेहमी प्रदर्शित होत असतात. ते अफाट आणि अचाट लोकप्रियही आहेत. पण, जय भीम'मधे या सिंघमी' पोलिसी अत्याचारामागच्या मानसिकतेकडे एक वेगळा दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे.भारतीय समाजात मनी-मानसी खोलवर रुजलेल्या जातीय उतरंडीतील खालच्या व तळच्या घटकांकडे पाहण्याचा वरिष्ठ समाजाचा तिरस्कृत दृष्टिकोन इथं अधोरेखित करण्यात आलेला आहे.

प्रतिष्ठित सवर्णांचा जातीयवाद

सिनेमात पहिल्याच दृश्यात पोलिस अधिकाऱ्याकडून दलित, आदिवासी समाजातल्या लोकांची वेगळी विभागणी करून पुन्हा त्या निरपराध लोकांची नावं इतर गुन्ह्यांत गोवायची आणि त्यांची रवानगी पुन्हा दुसऱ्या कारागृहाकडे करायची, असं चालल्याचं दिसतं. या सामाजिक शोषणाची वाच्यता करत सिनेमा पुढे सरकतो. लोकांच्या घरातला साप पकडून, शेतातले उंदीर मारून, विषावर उतारा देऊन, मिळेल तो रोजगार करून आपापल्या परीने आनंदी जीवन जगणाऱ्या आणि सुखी भविष्याची स्वप्नं पाहणाऱ्या या आदिवासींना जातीयवादाचा सामना मात्र हरघडी करावा लागतो. सरपंचाच्या घरातला साप पकडण्यासाठी दुचाकी घेऊन बोलवायला आलेला नोकर राजाकन्नूचा स्पर्श करून घेत नाही. नंतरच्या एका दृश्यात राजाकन्नूला बेदम बदडताना मात्र त्याला स्पर्शाची फिकीर नसते. पोलिस व्यवस्थाही गावातल्या प्रतिष्ठित सवर्णांची हस्तक म्हणून काम करायला तयार होते, याचं कारण त्यांच्यात सुप्त दडलेल्या जातीयवादी मानसिकतेमधे आहे.

स्वतःच्याच देशात ओळख नाही

खालच्या जातीचे लोक हे गुन्हेगारी प्रवृत्तीचेच असतात. किंबहुना, या देशात स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी काही जमातींवर गुन्हेगारी जमात म्हणून शिक्का मारलेला होता. परिसरात काही घडलं तरी या जमातींमधल्या लोकांची धरपकड करायची. गुन्हा त्यांनी केला असो वा नसो, त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारे कबूल करवून घ्यायचा आणि त्यांची रवानगी तुरुंगात करायची. अशा प्रकारांमधे या जमातींच्या पिढ्यानपिढ्या बरबाद झाल्या. गुन्हेगारीचा शिक्का कपाळावर कायम बसलेल्या या समाजाला इतर कोणतीही ओळख या देशात मिळवायची मोठी अडचण झाली.

शाहू महाराजांनी करून दाखवलं

सिनेमा पाहताना राजर्षी शाहू महाराजांची आठवण मात्र झाल्याशिवाय राहत नाही. शंभर वर्षांपूर्वी या महान राजाने आपल्या संस्थानात गुन्हेगारी जमात म्हणून शिक्का बसलेल्या लोकांमधल्या हजेरीची प्रथा बंद केली आणि त्यांना प्रतिष्ठेने वागायला प्रवृत्त केलं. प्रतिष्ठापूर्ण जगायला आवश्यक साधनं आणि संधी त्यांना उपलब्ध करून दिल्या. काहींना आपल्या सेवेतही सामावून घेतलं. तेव्हापासून संस्थानातल्या गुन्हेगारीचं प्रमाण कमी झाल्याचं स्वतः महाराजांनी वेळोवेळी सांगितलं. देशात इतर अनेक ठिकाणी ही प्रथा कायम राहिली आणि तिच्या फांद्या शंभर वर्षांनंतरही या जाती-जमातींच्या गळ्याचा फास ठरू लागल्या, याचीच प्रचिती सिनेमात येते.

सिनेमात बाबासाहेब,

मार्क्सचं अस्तित्व

पोलिस खात्यातल्या काही उच्चवर्णीय लोकांकडून जातीयवादी भूमिकेतून क्रूर शोषणाला वाचा फोडून, त्याला प्रतिरोध निर्माण करण्याची भूमिका सिनेमा मांडत असला, तरी तो कोणत्याही प्रकारे व्यवस्था भंजनाच्या मार्गाचा पुरस्कार करत नाही, तर सनदशीर मार्गानेच न्यायासाठी आग्रही राहतो, हे याचं महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. सिनेमात चंद्रू एका शाळेच्या कार्यक्रमात फॅन्सी ड्रेस स्पर्धेतला बाल स्पर्धक पाहून म्हणतो, इथं सारे नेते आहेत. डॉ. आंबेडकर मात्र दिसत नाहीत.' बाबासाहेबांना आजही समाजाने सर्वमान्यतेपासून कसं वंचित ठेवलंय, हे सांगायला एवढं एक वाक्य समर्थ आहे. पण सिनेमाच्या संपूर्ण पार्श्वभूमीमधे आपल्याला बाबासाहेबांचं, मार्क्सचं अस्तित्व सतत जाणवत राहतं.

तामिळ सिनेसृष्टीचा संदेश

बाबासाहेबांनी नेहमी सनदशीर मार्गानीच आपले लढे लढायला प्राधान्य दिलं. त्यांनी अनुयायांनाही त्याच मार्गाने न्याय्य हक्कांचा झगडा मांडण्याची शिकवण दिली. शिक्षण, ज्ञानसंपादन हाच उन्नतीचा सर्वोत्तम मार्ग असून त्या दिशेने वाटचाल करायला त्यांनी केवळ दलित, वंचितांनाच नाही; तर संपूर्ण भारतीय समाजाला प्रवृत्त केलं. माणसाचं मानसिक, आर्थिक आणि सामाजिक-सांस्कृतिक उन्नयन करण्याची ताकद शिक्षणातच आहे, याची जाणीवपेरणी बाबासाहेबांनी हयातभर केली. मात्र, आजही देशातल्या अनुसूचित जाती, जमाती, शोषित, वंचित, आदिवासी, दलित समाज शिक्षणाच्या परिघाबाहेर आहे. त्यामुळेच दुर्दैवाचे दशावतार त्यांच्याभोवतीने फेर धरून नाचताहेत, याची जाणीव हा सिनेमा करून देतो. तामिळ सिनेसृष्टी बाबासाहेबांकडे आणि त्यांच्या संदेशांकडे अत्यंत गांभीर्यपूर्वक आणि सकारात्मकतेने पाहू लागली आहे, हे अलीकडच्या काळात आलेल्या काही सिनेमांमधून प्रकर्षाने जाणवत आहे. ही गोष्ट भारतीय सिनेसृष्टीच्या सामाजिक-सांस्कृतिक प्रगल्भतेसाठी अत्यंत लक्षणीय आहे. हे करत असताना त्यांनी थोडी सिनेमॅटिक लिबर्टी घेतली, तर त्याला कोणाची हरकत असण्याचं कारण अजिबातच नाही!

# दिग्गजांकडून 'दीपपर्व २०२१' विशेषांकाचे कौतुक

पणजी/बीड : वर्तमान माध्यम समुहाच्या 'दीपपर्व २०२१'चे विविध क्षेत्रातील दिग्गजांनी कौतुक केले आहे. प्रसिध्द अभिनेता रितेश देशमुख, ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे, जागतिक कीर्तीचे पखवाज वादक पंडित उध्दवबापू आपेगावकर, काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, ॲड.भानुदास डक, शेकापचे भाई ॲड.नारायण गोले पाटील, उद्योजक विलास थोरात, वन परिक्षेत्र अधिकारी उत्तम चिकटे, सरपंच उध्दव कोळसे पाटील, सरपंच पांडुरंग मते, भाजपा युवा नेते ऋषीकेश आडसकर, केज बाजार समितीचे उपसभापती लक्ष्मीकांत लाड, उद्योजक चंद्रकांत बिक्कड, गटविकास अधिकारी प्रज्ञा माने-भोसले, संजीवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले आदींना विशेषांक भेट देण्यात आला.
















# गट-तट विसरून निवडणुकीच्या कामाला लागा

## खासदार डॉ.प्रितम मुंडे यांच्या कार्यकर्त्यांना सूचना

▶ प्रतिनिधी



माजलगाव : आपसा-आपसातील सर्व मतभेद गट-तट विसरून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या कामाला लागा, अशा स्पष्ट सूचना बीडच्या खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी कार्यकर्त्यांना दिल्या. त्या माजलगाव येथे कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होत्या.

स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती यासारख्या निवडणुका या कार्यकत्यांच्या असतात. त्यांच्यासाठी नेत्यांनी गट-तट बाजूला ठेऊन येणाऱ्या निवडणुका एकदिलाने लढवून त्या ताब्यात घ्याव्यात असे आवाहन खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी नेत्यांसह कार्यकर्त्यांना केले. होवू घातलेल्या विविध निवडणूकांच्या तोंडावर नेत्यांसह कार्यकर्त्यांची मोट बांधणी करण्यासाठी सोमवारी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात आयोजित भाजपच्या कार्यकर्ता बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर भाजपचे रमेश आडसकर, मोहन जगताप, तालुकाध्यक्ष अरुण राऊत, डॉ.प्रकाश आनंदगावकर, ज्ञानेश्वर मेंडके, बबनराव सोळंके, नितीन नाईकनवरे, गौरीताई देशमुख आदी उपस्थित होते. पुढे बोलताना खासदार डॉ.प्रितम मुंडे म्हणाल्या की, नेत्यांच्या निवडणुकीला आणखी बराच अवधी असून आता पक्षात एकनिष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या निवडणुका तोंडावर आल्या आहेत. प्रत्येक संस्था भाजपच्या ताब्यात घेण्यासाठी या निवडणुका सर्वांनी एकत्रित येऊन लढायच्या आहेत. कोणीही गटबाजी न करता पक्ष नेतृत्वाला जे योग्य वाटेल त्याला उमेदवारी देण्यात येईल. त्या अगोदर उमेदवाराची पात्रता, पक्षाशी असलेली एकनिष्ठा आदी तपासूनच निवडणुकीचे तिकीट ज्यांना मिळेल त्यांना निवडणूक आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायचे आहेत. यावेळी कार्यकर्ते उपस्थित होते.

# बाजीराव धर्माधिकारींकडून कुलगुरू डॉ.येवले यांचे स्वागत

▶ प्रतिनिधी

परळी वैजनाथ : येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय येथे 'नवीन राष्ट्रीय शैक्षणीक धोरण व विद्यापीठाची भूमिका' या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. प्रमोद येवले यांचे व्याख्यान झाले. यावेळी त्यांचे परळी नगरीत आगमनानिमित्त माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांनी स्वागत केले.

याप्रसंगी संजय देशमुख, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे अधिसभा सदस्य व व्यवस्थापकीय मंडळ सदस्य डॉ.नरेंद्र काळे, अधिसभा सदस्य प्रा.डॉ.धोंडगे, माजी नगराध्यक्ष तथा अधिसभा सदस्य बाजीराव धर्माधिकारी विद्यापरिषद सदस्य प्रा.डॉ.पी.एल.कराड, प्राचार्य लक्ष्मण मुंडे, प्रा.डॉ.माधव रोडे, रविंद्र देशमुख, प्रा.प्रसाद देशमुख, प्रा.डॉ. विनोद जगतकर, प्रा.राजकुमार येल्लावाड तसेच परळी व परिसरातील महाविद्यालयांचे प्राचार्य प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कुलगुरू डॉ.प्रमोद येवले यांनी 'नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विद्यापीठाची भूमिका' या विषयावर सखोल व अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले.






आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.